## <u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.</u>

**नि.फौ.ख.क्र. १५/२०१७.** **<u>दोषारोप</u>** **नि. क्र. / सी**

मी आर. पी. थोरे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा याद्वारे तुमच्यावर दोषारोपण करतो की,

**बाळाप्पा लक्ष्मण हालगली.**

वयः ३२ वर्षे, धंदाः मजूरी,

रा. अलदकट्टी, तायरगट्टी, ता. सौंदत्ती, जि. बेळगाव.

तुम्ही दि.२५.०९.२०१५ रोजी १६.०० ते २०.०० वा. चे दरम्यान आजरा सहकारी साखर कारखाना लि. गवसे. ता. आजरा येथील साखर तुमच्या ताब्यातील ट्रकचा बनावट नं. के. ए.–२३–ए.–१८४८ मधून गोडावून नं.१ मधील प्रत्येकी ५० किलो वजनाची ४२० पोती केरळ येथे न पोहोचवता अन्य ठिकाणी नेऊन फिर्यादी व दलाल व्यापा–याचा विश्वासघात करुन फसवणूक करुन भारतीय दंड संहितेचे कलम **४२०** प्रमाणे गुन्हा केला असुन माझे दखलगिरीत आहे.

तुम्ही वरील कालावधीमध्ये फिर्यादीने तुमच्याकडे विश्वासाने सोपवलेल्या प्रत्येकी ५० किलो वजनाच्या ४२० साखरेच्या पोत्यांचा अपहार करुन तिचा स्वतःसाठी वापर अथवा ती पोती केरळ येथे पोहोचवण्याचे आदेश असून देखील अप्रामाणिकपणे त्या मालमत्तेचा वापर करुन बुध्दीपरस्पर कृत्य करुन भारतीय दंड संहितेचे कलम **४०६** प्रमाणे गुन्हा केला असुन माझे दखलगिरीत आहे.

आणि मी याद्वारे असे निर्देशित करतो की, तुम्हांविरुध्द वरील प्रमाणे दोषारोप ठेवुन प्रकरण चालविणार आहे.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

( आर. पी. थोरे )

दिनांक – १८.१०.२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

## <u>प्रमाणपत्र</u>

आरोपींना दोषारोपणातील मजकुर वाचुन व समजावुन सांगण्यात आला. आरोपींनी सदर आरोप कबुल नसल्याचे सांगुन संपरिक्षेची विनंती केली.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

( आर. पी. थोरे )

दिनांक – १८.१०.२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.**

**नि.फौ.ख.क्र. १५/२०१७.** **नि. क्र. / सी**

**बाळाप्पा लक्ष्मण हालगली.**

वयः ३२ वर्षे, धंदाः मजूरी,

रा. अलदकट्टी, तायरगट्टी, ता. सौंदत्ती, जि. बेळगाव.

**आरोपीचे कथन**

प्र.क्र.१– तुम्हाला पोलीस पेपर्सच्या प्रति मिळाल्या काय ?
उत्तरः– होय.

प्र.क्र.२– तुम्हाला अपराधातील तपशिल समजला काय ?
उत्तरः– होय.

प्र.क्र.३– तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तरः– नाही.

प्र.क्र.४– तुम्हाला सरकारी खर्चाने वकीलाची नियुक्ती हवी आहे काय ?
उत्तरः– नाही.

–––––––––––––––––
आरोपीची सही/निशाणी अंगठा.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

( आर. पी. थोरे )

दिनांक – १८.१०.२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

.